**ठळक बातम्या**

- ब्रिक्स देशांच्या कृषीमंत्र्यांची आणि शेतीविषयक कृतीगटाची महत्त्वाची बैठक उद्यापासून मध्यप्रदेशात इंदूर इथं होणार
- नीट-यूजी २०२६ च्या फेरपरीक्षेसाठी केंद्रांची यादी जाहीर/ गैरप्रकार टाळण्यासाठी कडक उपाययोजना
- राज्यसभेच्या महाराष्ट्रातल्या रिक्त जागेच्या पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेंद्र जैन यांचा उमेदवारी अर्ज दाखल
- शस्त्रसंधीचा भंग करत इराणचे इस्राएलवर क्षेपणास्त्र हल्ले, इस्राएलचंही प्रत्युत्तर

**आणि**

- अफगाणिस्तानविरुद्धच्या क्रिकेट कसोटी सामन्यात भारताने दिला फॉलोऑन

**<><><><><>**

ब्रिक्स संघटनेचं अध्यक्षपद सध्या भारताकडे असून ब्रिक्स देशांच्या कृषीमंत्र्यांची आणि शेतीविषयक कृतीगटाची महत्त्वाची बैठक उद्यापासून मध्यप्रदेशात इंदूर इथं होणार आहे. केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आज भोपाळमधे पत्रकारपरिषदेत ही माहिती दिली. जगातल्या एकूण शेतजमिनींपैकी ४२ टक्के क्षेत्र ब्रिक्स देशांकडे आहे आणि एकूण अन्नधान्य उत्पादनापैकी ४५ टक्के उतापदन या देशांमधे होतं, असं त्यांनी सांगितलं. या बैठकीतल्या चर्चेमुळे ब्रिक्स देशांमधल्या कृषीविषयक सहकार्याला नवी दिशा मिळेल असा विश्वास चौहन यांनी व्यक्त केला. या बैठकांमधे शेतकऱ्यांचं उत्पन्न, कृषी पतपुरवठा इत्यादी महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होईल असं ते म्हणाले.

**- - - होल्ड - बाईट- चौहान- - -**

**- <><><><><>**

येत्या २१ जून रोजी होणाऱ्या नीट-यूजी २०२६ च्या फेरपरीक्षेसाठी केंद्रांची यादी जाहीर झाली आहे. ही परीक्षा देशातल्या ५५१ केंद्रांवर दुपारी २ ते सव्वा पाच या वेळात लेखी पद्धतीनं होणार असून परदेशातल्या १४ शहरांमध्येही होणार आहे. प्रवेशपत्र आणि इतर

माहितीसाठी विद्यार्थ्यांनी अधिकृत संकेतस्थळाशी संपर्कात राहण्याचं आवाहन एनटीएनं केलं आहे. वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीची नीट-यूजी परीक्षा यंदा ३ मे रोजी घेण्यात आली होती, मात्र पेपर फुटल्यामुळे एनटीएनं ही परीक्षा रद्द केली होती. सीबीआय सध्या या प्रकरणाची चौकशी करत आहे. दरम्यान, येत्या २१ जूनला होणाऱ्या या फेरपरीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याचा दावा एनटीएनं, फेटाळला आहे. विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांमधल्या परीक्षेबाबतच्या तणावाचा गैफायदा घेऊन अशा अफवा पसरवणाऱ्या संघटित टोळ्यांचं हे काम असल्याचं एनटीए नं समाज माध्यमांवरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे. परीक्षा प्रक्रियेची विश्वासार्हता अबाधित असून, उमेदवारांना सुरक्षित आणि निःपक्षपाती वातावरणात परीक्षा देता यावी, यासाठीच्या उपाययोजना करण्यात आल्याचं यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

राज्यसभेच्या महाराष्ट्रातल्या रिक्त झालेल्या एका जागेसाठीच्या पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेंद्र जैन यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी खासदार प्रफुल पटेल, पार्थ पवार, सुनील तटकरे, छगन भुजबळ उपस्थित होते. तसचं भाजपा नेते आशीष शेलार आणि शिवसेना नेते भरत गोगावले हे देखील उपस्थित होते. उमेदवारी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस असून उद्या अर्जाची छाननी होईल. दरम्यान, पोटनिवडणुकीसाठी महाविकास आघाडीकडून उमेदवार दिला गेला नाही. त्यामुळे जैन यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

पक्षाच्या प्रमुख नेत्यांच्या बैठकीनंतर काल जैन यांच्या नावाची घोषणा झाली. या जागेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून छगन भुजबळ, अविनाश आदिक, प्रमोद हिंदूराव तसंच अमरसिंह पंडित इच्छुक होते. मात्र पक्षाने जैन यांच्या नावावर शिक्कामोर्तब केलं. राजेंद्र जैन हे विधानपरिषदेचे माजी सदस्य आहेत, ते प्रफुल्ल पटेल यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात.

**<><><><><>**

राष्ट्रकुल संसंदीय संघटनेची उत्तर विभागाची बैठक आजपासून चंडीगढमध्ये आयोजित करण्यात आली आहे. तीन दिवस चालणाऱ्या या बैठकीचं यजपानपद हरियाणा विधानसभेकडे आहे. दुपारी ३ वाजता लोकसभेचे सभापती ओम बिर्ला या परिषदेचे उद्घाटन करतील. या कार्यक्रमाला राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश, हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंग

सैनी तसंच १५ राज्यांच्या विधिमंडळांचे पीठासीन अधिकारी आणि लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

आकाशवाणीच्या स्थापनेला नव्वद वर्ष पूर्ण होत आहेत. आजच्याच दिवशी, ८ जून १९३६ रोजी इंडियन स्टेट ब्रॉडकास्टिंग सर्व्हिसचं नाव बदलून ऑल इंडिया रेडिओ ठेवण्यात आलं. स्वातंत्र्यानंतर ऑल इंडिया रेडिओचा वेगाने विस्तार झाला आणि १९५६मध्ये आकाशवाणी हे नाव स्वीकारण्यात आलं. आज आकाशवाणीची ५९१ केंद्र देशभरात कार्यरत आहेत. देशाच्या ९८ टक्के लोकसंख्येपर्यंत विस्तारलेली रेडिओ सेवा २३ भाषा आणि १४६ बोलीभाषांमधून प्रसारित होते. तसंच आकाशवाणीचा बाह्य सेवा विभाग १००पेक्षा जास्त देशांमध्ये प्रसारित होतो आणि परदेशातल्या भारतीयांशी संवाद साधतो. बहुजन हिताय, बहुजन सुखाय या आपल्या ध्येयवाक्याला अनुसरून आकाशवाणी वृत्तसेवा विभाग काम करत आहे. रेडिओ वार्तांकन क्षेत्रात व्यावसायिक नीतिमत्ता आणि मानकांचं पालन करून देशातल्या प्रत्येक नागरिकापर्यंत सर्व प्रमुख भाषा आणि बोलीभाषांमधून बातम्यांचं प्रसारण करण्यासाठी सदैव प्रयत्नशील आहे.

<><><><><>

इस्राएलने आज इराणविरुद्ध मोहीम पुन्हा उघडली असून इराणच्या अनेक शहरांमधे आज इस्राएलच्या हल्ल्यांमुळे स्फोट झाल्याचं वृत्त आहे. ८ एप्रिलच्या युद्धविरामानंतर इराणने इस्रायलवर पहिल्यांदाच काल क्षेपणास्त्र हल्ला केला. या घटनेनंतर इराणच्या हल्ल्यांना इस्राएलने प्रत्युत्तर देऊ नये असं आवाहन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी केलं होतं. शस्त्रसंधी कायम ठेवून दोन्ही देशांनी वाटाघाटी आणि संवादाच्या मार्गाने पुढे जावं असं आवाहन त्यांनी पुनाह एकदा केलं आहे. मात्र या हल्ले प्रतिहल्ल्यांमुळे पश्चिम आशियातला तणाव पुन्हा एकदा वाढला आहे.

या परिसरात हवाई वाहतुकीत अडथळे निर्माण झाले असून इराक आणि सीरियाने आपापल्या हवाई हद्दी बंद केल्या आहेत.

दरम्यान, इराणमधल्या भारतीयांनी लौकरातलौकर देश सोडावा असा सल्ला परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने जारी केला आहे.

<><><><><>

अंमली पदार्थांशी संबंधित एका मनी लॉंड्रिंग प्रकरणात ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयाने मिझोराम-म्यानमाँ सीमा, त्रिपुरा-बांग्लादेश सीमा आणि पश्चिम बंगालमधल्या चार ठिकाणी शोधमोहीम राबवली आहे. अंमली पदार्थ विरोधी विभागाच्या आगरताळा युनिटने काही दिवसांपूर्वी केलेल्या कारवाईत ४९ किलोहून अधिक मेथाम्फेटामाईन आणि ४० ग्रॅम हेरॉईन जप्त केलं होतं. या प्रकरणाच्या तपासात म्यानमाँहून अंमली पदार्थ मिळवणाऱ्या संघटित गुन्हेगारी कारवाईबाबत माहिती मिळाली होती. या प्रकरणाच्या तपासाचा भाग म्हणूनच ईडीने ही शोधमोहीम राबवली आहे.

<><><><>

चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग दोन दिवसांच्या उत्तर कोरियाच्या दौऱ्यावर गेले आहेत. जवळपास सात वर्षांनंतर जिनपिंग यांचा प्योंगयांगचा हा पहिलाच दौरा आहे. द्विपक्षीय चर्चेत आर्थिक सहकार्य, कोरियन द्वीपकल्पावरील सुरक्षा आणि प्योंगयांग, बीजिंग आणि मॉस्को यांच्यात समन्वय वाढवण्यावर लक्ष केंद्रित होण्याची अपेक्षा आहे.

<><><><>

इंधनाचे दर वाढत असले तरी देशात वाहनांची विक्री गेल्यावर्षीच्या तुलनेत मे २०२६ मधे साडे नऊ टक्क्यानी वाढल्याचं फाडा अर्थात फेडरेशन ऑफ ऑटोमोबाईल डीलर्स असोसिएशनच्या अहवालात म्हटलं आहे. मे २०२६ मधे एकूण २५ लाख ३१ हजार ६७ वाहनांची विक्री झाल्याचं फाडाने म्हटलं आहे. मे २०२५ मधे वाहनांची किरकोळ विक्री २३ लाख १० हजार ४५१ इतकी झाली होती.

मे महिन्यात प्रवासी वाहनांची विक्री ४ लाख २ हजार ५९१ झाली. यात गेल्यावर्षीच्या तुलनेत सव्वा २३ टक्के वाढ झाली. दुचाकी वाहनांची विक्री १७ लाख १५ हजार ५८१ झाली. यात गेल्या वर्षीच्या तुलनेत साडे सात टक्के वाढ झाली. तिनचाकी वाहनांची विक्री १ लाख ११ हजार ५२६ झाली. यात गेल्यावर्षीच्या तुलनेत साडे तीन टक्के वाढ झाल्याचं फाडाच्या अहवालात म्हटलं आहे.

<><><><>

न्यू चंदीगड इथं सुरू असलेल्या कसोटी क्रिकेट सामन्यात अफगाणिस्तानचा पहिला डाव १५२ धावांवर आटोपल्यावर भारताने त्यांना फॉलोऑन दिला आहे. या सामन्यात भारतीय संघाने ४१२ धावांची आघाडी घेतली आहे. अफगाणिस्तानच्या संघाला १५२

धावांवर गारद करण्यात डावखुरा फिरकी गोलंदाज मानव सुथार याने सहा बळी घेऊन महत्त्वपूर्ण योगदान दिलं. मानव सुथारने अवघ्या ३३ धावांच्या मोबदल्यात अफगाणिस्तानच्या सहा फलंदाजांना तंबुचा रस्ता दाखवला. पदार्पणातच ही कामगिरी करणारा तो पहिला भारतीय डावखुरा फिरकी गोलंदाज तर पदार्पणात पाच बळी घेणारा दहावा भारतीय गोलंदाज ठरला आहे.

**<><><><><>**

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत जर्मनीच्या अलेक्झांडर जेरेव्हंनं, काल आपल्या पहिल्या ग्रँड स्लॅम पुरस्कारावर नाव कोरलं. रोलँड गॅरो इथं झालेल्या या सामन्यात पाच-सेटच्या अंतिम फेरीत इटलीच्या फ्लावियो कोबोलीला पराभूत करून त्यानं हा विजय मिळवला.

**//<><><><><>//**